[ ११ ]

ः प.पू. बाबांचे षष्ट्यब्धीपूर्ती समारंभाचे निमित्ताने ः

पवित्र असा हा शुभमंगल दिन आज पहा उगवला ।
पूर्वसंचित म्हणुनिच आम्ही सोहळा हा स्वनयनी पाहिला ।।१।।

योग्यांची ही परंपरा हो स्वामी लोकनाथ व गुळवणी महाराजा पासून ।
गिरिजापती श्री शंकरानेही ज्या योगा केले जतन ।।२।।

राजमार्ग हा मोक्ष साधण्या सद्गुरू वाचुन मिळत नसे ।
जया मनी गुरूनिष्ठा वसे त्यावरीच सद्गुरूकृपा होत असे ।।३।।

श्रीगुरू सिद्धयोगेश्वर यानी मिळविली सद्गुरू कृपा ।
सिद्ध झाले सद्गुरू कृपेने वाटीती संजिवनी न लाविता मापा ।।४।।

द्ध मागे सि जोडण्या तपस्या यानी केली अपार ।
योगिराज हे सिद्ध करिती भक्तासी भव पार ।।५।।

गेल्या काळा सोडा आतातरी दिल्या साधना सुरू करा ।
श्वसि लावून काना नि स रोखोनि ठायी यासी धरा ।।६।।

रविकिरणासम आत्मरूपासी पहाण्या दृष्टी दिली सद्गुरूनी ।
महादेव तो कैलासराणाही बसला पहा भृकुटी दृष्टी लावूनी ।।७।।

हा योगियांचा मार्ग म्हणून ज्ञानदेवे उद्धृत केला ।
राजमार्ग हा मोक्ष प्राप्तीचा सद्गुरूनी आम्हा दिधला ।।८।।

जगा उद्धरती सिद्ध पुरूष हे कामना कशाची नसे ।
शवासही उठविती बोल यांचे शक्तीचा यांचे पार नसे ।।९।।

तारक शक्ती एकच जगी या सद्गुरूठायी वसत असे ।
युगे अठ्ठाविस उभा पांडुरंग गुरूमहिमा नामयासी सांगतसे ।।१०।।

होत हे सद्गुरू अती दयाळू शिष्यासाठी स्वतः पहा झीजती ।
वोणवोनी मस्तका माझ्या जोडितो द्वय हाता सद्गुरू चरणावरती ।।११।।

तसेच विनविते जगन्नायका दिर्घायुरारोग्य मिळो बाबासी या पुढती ।